**फॅक्स संदेश**
**महात्वाचे**

जा.क्र.शिउसं/प्राशि २/शिनि/समा/पुवि/११-१२
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : १/१२/२०११

प्रति,

प्रशासन अधिकारी, नगरपालिका शिक्षण मंडळ, पुणे विभाग, पुणे.

विषय :- ३०/९/२०११ चे पटसंख्येवर अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे समावेशनाबाबत.

संदर्भ :- शासन निर्णय क्र. टीएलएस १००३/(७०७)/२००३/प्राशि ३ दि. १९/११/२००३

सन २०११-१२ या शैक्षणिक वर्षातील माहे ३० सप्टेंबरच्या पट व सरासरी उपस्थितीच्या आधारे पुणे विभागातील सर्व नगरपालिका, महानगरपालिका व जिल्हा परिषद प्राथमिक शाळांची शिक्षक निश्चिती करण्यात आलेली आहे. या शिक्षक निश्चितीनुसार काही जिल्हा परिषद व नगरपालिका, महानगरपालिका मध्ये शिक्षक अतिरिक्त झाले आहेत. संदर्भाधीन शासन निर्णयातील तरतूदीनूसार विभागीय शिक्षण उपसंचालक यांना सदर अतिरिक्त शिक्षकांची विभागातील अन्य जिल्हा परिषद, महानगरपालिका व नगरपालिका शिक्षण मंडळाचे शाळांतील रिक्त जागावर समायोजन करण्याचे अधिकार प्राप्त झाले आहेत. त्याकरिता आपल्या जिल्हा परिषद, महानगरपालिका व नगरपालिका कडे ३० नोव्हेंबर २०११ अखेर व दि. ३१ डिसेंबर २०११ अखेर रिक्त होणा-या शिक्षक पदांची माध्यम निहाय माहिती उलट टपाली या कार्यालयास सादर करावी. तसेच ३० सप्टेंबरच्या शिक्षक निश्चिती नुसार आपल्या स्तरावर समायोजित न होवू शकणा-या अतिरिक्त प्राथमिक शिक्षकांची माध्यमनिहाय संख्या खालील प्रपत्रात माध्यमनिहाय स्वतंत्र प्रपत्रात उलटटपाली फॅक्स संदेशाव्दारे या कार्यालयास सादर करावी.

संदर्भाधिन शासन निर्णयातील तरतूदी नुसार या कार्यालयाकडे अतिरिक्त शिक्षकांचे समावेशन पूर्णतः झाले आहे याची खात्री करुन घेण्यासाठी या कार्यालयाचे नाहरकत प्रमाणपत्र घेतल्याशिवाय शिक्षण सेवक भरती करण्यात येऊ नये. तसेच वर्गीकरणाने प्राथमिक शिक्षकाच्या सेवा अन्य जिल्हा परिषद, महानगरपालिका व नगरपालिका मधून भरण्यात येऊ नयेत.

प्रपत्र

आस्थापनेचे नाव :- नगरपालिका/महानगरपालिका/जिल्हा परिषद माध्यम :-
मराठी/उर्दू/कन्नड/तेलगू/हिंदी

| अ. क्र. | प्रवर्ग | दि. ३१/१०/२०११ रोजी होणारी रिक्त पदे | दि. ३१/१२/११ रोजी होणारी रिक्त पदे | दि.३०/९/२०११ चे शिक्षक निश्चिती नुसार अतिरिक्त पदे | दि. १/१२/२०११ रोजी शिल्लक रहानारी अतिरिक्त शिक्षक पदे | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | अनु.जाती | | | | | |
| २ | अनु.जमाती | | | | | |
| ३ | विमुक्त जाती (अ) | | | | | |
| ४ | भटक्या जमाती (ब) | | | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ५ | भटक्या जमाती (क) | | | | | |
| ६ | भटक्या जमाती (ड) | | | | | |
| ७ | इतर मागास | | | | | |
| ८ | विशेष मागास | | | | | |
| ९ | खुला प्रवर्ग | | | | | |
| | एकूण | | | | | |

**. (रा.ना.जाधव)**
**शिक्षण उपसंचालक,**
**पुणे विभाग, पुणे-१.**

.